# उपसंहार

मराठी कथासाहित्यात दर्जेदार कथालेखन करणारे कथाकार म्हणून श्री. शरच्चंद्र वासुदेव चिरमुले यांचा उल्लेख केला जातो. अत्यंत मोजकेच पण वाङ्.मयीनदृष्ट्या सकस असे त्यांचे लेखन आहे, त्यांचे एकूण पाच कथासंग्रह आणि दोन लेखसंग्रह प्रसिध्द झाले आहेत त्यापैकी " श्री शिल्लक आणि कॅाग्ज " या दोन कथासंग्रहाचा अभ्यास प्रस्तुत प्रबंधिकेत केला आहे.

हा अभ्यास करतांना पहिल्या प्रकरणामध्ये आधुनिक मराठी कथेच्या विकासाचा आढावा घेतला आहे, अगदी चक्रधर ते हरिभाऊ आपटे यांच्या " स्फुटगोष्टी " पर्यंतचा त्रोटक स्वरुपात विचार करुन पुढे सविस्तर रुपाने बदलत्या टप्प्यांचा विकास पाहिला आहे.

कथेच्या व्याख्यांचा थोडक्यात निर्देश करुन कथाकारांच्या कथालेखनाबरोबर त्याचे लेखन विशेष पाहिले आहेत. प्राम्मुख्याने कथेच्या विकासातील महत्त्वाचे टप्पे लक्षात घेऊनच या कथांचा आढावा घेतला आहे.

प्रकरण दोन आणि तीन मध्ये " श्रीशिल्लक " आणि " कॅाग्ज " या कथासंग्रहांचा अभ्यास करुन श्री शरच्चं- द्र वासुदेव चिरमुले यांच्या लेखनाचे गुणविशेष शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

चिरमुल्यांच्या लेखनाचे गुणविशेष पाहतांना कथेच्या कथानक, , पात्रस्वरुप, संवाद, वातावरण, निर्मिती निवेदन शैली भाषा, अनुभवविश्व इ. घटकानुसारच अभ्यास केला आहे.

चिरमुल्यांच्या कथेतील कथानकाचा अभ्यास करतांना, कथाबाजीच्या विस्तारातूनच कथानक साकार होत असते. म्हणूनच प्रत्येक कथेत एक मध्यवर्ती कल्पना असते. तिचा विस्तार घटना-प्रसंगाच्या कालक्रमानुसार आणि कार्यकारण भावानुसार होत असतो. याचा विचार करतांना चिरमुल्यांच्या कथानकाचे कांही ठळक विशेष जाणवतात.

चिरमुल्यांच्या कथाविश्वाचा विचार करतांना एक गोष्ट ठळकपणे जाणवते, ती म्हणजे जवळजवळ सर्वच कथा ह्या घटनाप्रधान आहेत. कथानकात घटना प्रंसगाची गुंफण विशिष्टप्रकारे केलेली असते. या घटना कालक्रमानुसार येत असतात पण काही कथांत या कालक्रमाची उलटापालट केलेली आहे. आणि अशा कालक्रमांच्या कलाटणीमुळे कथानक वैशिष्टयपूर्ण ठरते.

" श्रीशिल्लक " या कथेमध्ये कथेची सुरुवात आणि शेवट यामध्ये योग्य समतोल साधलेला आहे. आणि या दोन घटनांमध्ये अनेक घटना-प्रसंगाची गुंफण चपखलरीतीने - घातलेली आहे या घटना प्रसंगातून पात्रांचे स्वभाव, त्यांची मन:स्थिती समजते. अशा प्रकारच्या कथा या कथा विश्वात आढळतात.

कांही कथांमध्ये कथानकातील घटना-प्रसग एकापाठोपाठ एक अशा कालक्रमाने येतात आणि कथानकाला विलक्षण गतिमानता येते उदा. तत्र का परिदेवना " एकेकाची अखेर" एक ( नेहमीचीच ) गोष्ट इ.

तर कांही कथातील कथानकात कालक्रमाची उलटापालट केलेली आहे. प्रतिलोम ( flash back ) पध्दतीचा वापर हा चिरमुल्यांच्या कथालेखनाचा विशेष आहे. त्यांच्या " बेणं " " आवर्त " चूकभूल इ. कथा या अशापध्दतीतून येतात, परंतु काळाची मोडतोड करतांना त्या कलात्मकतेते कुठेही कमी पडत नाहीत, तर प्रसंग कसदार रीतीने व्यक्त करण्यात त्या समर्थ ठरल्या आहेत.

" श्रीशिल्लक " " ट्रॅपीझ " " पार्क " आवर्त अशा कथांचो सुरुवात आणि शेवट हा वर्तमानात घडलेला आहे, तर मध्यंतरी कथानक भूतकाळात जाते अशाप्रकारची वैचित्र्यपूर्ण पण सुसंघटीत रचना या कथांमध्ये आढळते.

कथानकांच्या काळाचा विचार करता काही कथानकांचा काळ एका दिवसाचा तर कांही कथानकाचा काळ सत्तर वर्षा पर्यंतचा आहे " बेणं" ह्या कथेचा काळ अवघ्या एक दोन दिवसांचा पण कथानकांचा काळ मात्र सत्तर वर्षापर्यंतचा आहे. तर " ट्रपीझ " " मारवा " धागे " सारख्या कथांच्या कथानकाचा काळ अवघ्या चार पाच तासांचा किंवा सकाळपासून रात्रीपर्यंत वा रात्रीपासून सकाळ पर्यंतचा आहे. एवढया अवकाशात सुध्दा कथांत अनेक प्रकारच्या प्रसंगाची गुंफण कलाकत्मकतेने घातलेली आहे ही गुंफण कौशल्यपूर्णतेने कथातंत्रात बसलेली आहे.

ही कथानके घडतांना यातील पात्रांवर जुन्या संस्काराचा परंपरांचा पगडा जाणवतो त्यांची अशी एक सांस्कृतिक घडण आहे. म्हणून ही पात्रे कुठेही बंड करत नाहीत तर सोशि-कपणे सहन करत राहातात. उदा. " श्रीशिल्लक " " आवर्त" युधिष्ठिराचा रथ " " बेणं " " कॅम्प " " एक ( नेहमीची ) गोष्ट इ.

चिरमुलेंना जुन्या जगाची विलक्षण मोहिनी आहे हे त्यांच्या " बेणं" एक ( नेहमीची ) गोष्ट " " ध्रुपद " सारख्या कथांतून जाणवते. विरुन चाललेले जग आणि बदलत असणारे नवीन जग याचा मनोहर संगम या कथात दिसतो, हा एक चिर-मुल्यांच्या लेखणीचा विशेष जाणवतो.

या कथानकांत काहीवेळेला विरोधलयाचा अविष्कार आढळतो. ही विरोधी लय दोन व्यक्तींच्या वर्तनातून ( बँकर-ट्रेडर-मॅनेजर ) स्वत:च्या यशस्वी जीवनात झालेल्या उपरेपणाच्या जाणिवेतून ( दि मर्मन ) दोन प्रवृत्तीतून( मारवा ) दोन, परिस्थितीतून ( बेणं ) संस्थानी वातावरण आणि या वाता-वरणाशी न जुळणाऱ्या वर्तनातून ( युधिष्ठिराचा रथ ) अशा विरोधलयातून कथानकाला सौंदर्यमूल्य प्राप्त होते. हा विरोधलयाचा अविष्कार हा चिरमुल्यांच्या लेखणीचा समर्थ आणि वैशिष्टयपूर्ण अविष्कार आहे.

सामान्यपणे अपरिचित अशी कथानके या कथांत दिसतात. विशेषत: संगीताच्या अनुभव विश्वातून जी कथानके घडतात ती वाचकांना वेगळा अनुभव देतात. संगीतातील सुरांना शब्दबध्द करुन मूर्त : स्वरुप देण्याचा लेखकाचा प्रयत्न विशेष आहे. " मारवा " " आवर्त " " धृपद " सारख्या कथांतून याचा प्रत्यय येतो.

कांही कथांची कथानके, " औदयोगिक अनुभव-विश्वातून फुललेली आहेत. इथेही अपरिचित अशा विश्वाचा वेध चिरमुलेंनी घेतलेला आहे उदा.कॅाम्ज " तत्र का परिदेवता " इ.

कथानकांत येणारा संघर्ष हा अत्यंत महत्वाचा असतो " श्री शिल्लक " व कॅाम्ज मधील कथांतील संघर्ष हा अपरिचितातून येताना दिसतो. आणि चिरमुल्यांच्या लेखणीचा विशेष ठरतो, त्यांच्या कथांतील हा संघर्ष व्यक्ती x व्यक्ती, व्यक्ती x परिस्थीती, व्यक्ती x नियती, श्रध्दा x अंधश्रध्दा जुने जग x नवेजग, अशा व्यापक स्वरुपाचा संघर्ष आहे. अशा संघर्षातून कथा साकार होतांना त्यांना गुणात्मक मूल्य प्राप्त होते.

अशाप्रकारे अपरिचित अशी कथानके या कथासंग्रहात आढळतात आणि चिरमुल्यांच्या लेखणीची समर्थता लक्षात येते.

चिरमुल्यांच्या कथेतील पात्रांचा अभ्यास करतांना ही पात्रे विविध वयोगटातील वेगवेगळ्या वृत्ती-प्रवृत्तीतून आलेली आहेत, या पात्रांना एक व्यापकपरिणामकारकता लाभलेली आहे. लेखकाच्या समृध्द अनुभवविश्वातन आलेल्या या पात्रांनीच

कथेला कथामूल्य प्राप्त करून दिले आहे.

पात्राच्या स्वरूपाचा अभ्यास करतांना, ही पात्रे विशेषत: मध्यम वर्गातून आलेली आहेत, परंतु या पात्रांच्यावर नियतीचाच अधिक प्रभाव जाणवतो. त्यामुळे आलेल्या दु:खा-समोर ती हतबल, अगतिक ठरलेली आहेत, त्यामध्ये बालवयातील आहेत, तशी तरूण आहेत, विवाहीत आहेत, अविवाहीत आहेत, उच्च मध्यमवर्गीय आहेत तशी मध्यमवर्गीय आहेत. राजघराण्यातीलही आहेत या सर्वच पात्रांच्यावर नियतीची छाया जाणवते.

ही पात्रे आपआपल्या ठिकाणी एकाकी वाटतात, " श्रीशिल्लक " कथेतील सरस्वती ही विश्वेश्वर आणि स्वामी यांच्या अनुक्रमे धार्मिक व नैतिक अध:पतनाचा बळी ठरते. आणि आपल्या आयुष्याचा हवाला प्राक्तनावर सोपवते. अशीच आपआपल्या विश्वात एकाकी असणारी पात्रे "ट्रॅपीझ" " दि मर्मन " " बेणं " " आवर्त " " कॅाग्ज " अहो भाग्यम् इ. अनेक कथांत दिसतात.

चिरमुल्यांच्या व्यापक अनुभवविश्वातून आलेली ही पात्रे लोकविलक्षण अशीच आहेत, त्यांना स्वत:चे असे स्वतंत्र व्यक्तिमत्व आहे. त्यांच्या जीवनात घडणाऱ्या घटनाप्रसंगातून मानसिक आंदोलनातून या कथा साकार झालेल्या आहेत.

ही पात्रे कांही वेळेला सर्वसामान्य अशी असली तरी त्यांच्या स्वभावातील अपरिचीतता मात्र वाचकांचे लक्ष वेधून घेते. ही अपरिचितता त्यांच्या वर्तनातून सहजच जाणावेते " मारवा " कथेतील गुरुनाथ," आवर्त " ची नायिका, " युधिष्ठिराचा रथ-"मधील दिलीप व बिरदी," वेणं"मधील राधा आजी, 'अहोभाग्यम्" मधील सोनाळकर" या सर्व पात्राचे स्वभाव विशेष सर्वस्वी अपरिचित असे आहेत. अशी पात्रे ही चिरमुल्यांच्या आशयगर्भ लेखणीचे वैशिष्टय आहे.

कथेत काही पात्रांचा मानसिक विकास होतांना दिसतो, " ट्रॅपोझ " कथेतील जोशीची मानसिक्ता हळूहळू बदलत जाते. " मारवा" मधील गुरुनाथाचे स्वभाव विशेष उत्तरोत्तर मर्मग्राही होत जातात. तर दु:ख कथेतील " तो " ची मानसिक्ता ताराच्या सांत्वनाने बदलते, " स्वामिनी" कथेतील नवोढा स्वामिनीमुळे सासऱ्याच्या स्वभावातच बदल होतो.

या पात्रांचे स्वभाव व वर्तन पाहता विशिष्ट असे संस्कार घेऊनच ती जगतात हे संस्कार वरवरचे नाहीत तर खोलवर रुजलेले आहेत. हे संस्कार त्यांच्या वर्तनातून आपल्याला जाणवतात, या कथातील सरस्वती ( श्रीशिल्लक ), जोशी ( ट्रॅपोझ ), विद्या( एका स्टेशन मास्तराची गोष्ट), भाईजी ( दि मर्मन ), तो ( दु:ख ), अहिल्या ( आवर्त ), दिलीप व बिरदी ( युधिष्ठिराचा रथ, ), गोपीनाथ ( कॅाग्ज ), शामाचार्य व लक्ष्मी (चूक-भूल ) या सर्वच पात्रांच्यावर जून्या संस्काराचा पगडा जाणवतो.

काहीवेळेला या पात्रांच्या वर्तनाला ही कुटूंबसंस्था, समाजसंस्थाच कारणीभूत आहे. कॅम्प, मधील गोपीनाथ सरळ बाण्याने वागू पाहणारा, परंतु त्याच्या सरळ वक्तव्याने त्याला चक्राच्या दातासारखे हेलपाटे घालावे लागतात. "चूकभूल " मधील लक्ष्मीला आपल्यावर होणा-या अन्यायामुळे घर सोडावे लागते आणि ती अधिकचे उध्वस्त होते, तिचा पती श्यामाचार्यही बापाच्या कृत्यामुळे आणि लक्ष्मीच्या निघुन जाण्यामुळे विरक्त वृत्तीने राहू लागतो, " तत्र का परिदेवता" मधील आर. के. अहिल्या यांचे स्वभाव विशिष्ट सामाजिक सांस्कृतिक वातावरणातून घडलेले दिसतात. तर काही वेळा भोवतालच्या परिस्थितीला कंठाळून या पात्रांचे स्वभाव आक्रंदतात आणि सोशिकही होतात. उदा. " युधिष्ठिरांचा रथ" मधील दिलीप व बिरदी तर जाणीवपूर्वक स्वत:ला विसरुन पाहणा-या सोनाळकंराचे ( अहो भाग्यम् ) वर्तनही या विशिष्ट सामाजिकतेतून घडले आहे.

पात्रांच्या वर्णनातून त्यांच्या स्वभावाची कल्पना येते " कॅम्पमधील कुलकर्णी, शिखरे साहेब, नानाजी शेट यांचे वर्णन, तसेच "श्रीशिल्लक " मधील विश्वेश्वराचे, " स्वामिनी" मधील सास-याचे, " चूकभूल " मधील बाळशास्त्रीचे इ. पात्रांच्या शारीर प्रकृतीच्या वर्तनातून त्याचे स्वभाव विशेष लक्षात येतात.

स्त्री पात्रांचा अभ्यास करताना या पात्रांवरही जुन्या संस्काराचाच पगडा जाणवतो, त्यामुळे आणि नियतीने निर्माण केलेल्या परिस्थितीमुळे ही पात्रे सोशिक व हतबल ठरलेली आहेत. उदा. सरस्वती ( श्रीशिल्लक ), सीतावहिनी (अनिकेत)

... ) राधा आजी ( बेणं ) सुमित्रा ( आवर्त ), चंद्राक्का ( एकेकाची अखेर ) लक्ष्मी ( चूकभूल ) तिमीरा ( एक नेहमीची गोष्ट ) इ. सर्वच पात्रे कुठेही त्रागा करीत नाहीत तर ती दु:खाचे कडूघोट गिळत जगतात.

बाल, तरुण, मध्यम वयाच्या पात्रांबरोबर वृध्द पात्रांचे चित्रण चिरमुलेंनी केलेले आहे. " बेण" मधील राधाआजी ही वर्तमान विसरुन भूतकाळात रमणारी आहे. ऐश्वर्य संपन्नेत गेलेले दिवस तिच्या समोर फेर धरतात. पण वास्तवात सगळे उध्वस्त झालेले . तरीही घराण्याच्या मूळ पुरुषाला नैवेद्य केला असता धाकटे मालक रागावतात तेव्हा ते अगतिकतेणे बोलते, हतबल होते. पण शेवटी त्यांना जवळ करते, हि दु:ख तिच्या वाटयाला नियतीनेच दिलेले आहे. अशी पात्रे या कथात दिसतात. उदा. चंद्रकाक्का ( एकेकाची अखेर ) वस्तादजी ( धृपद ) इ.

ही सर्वचपात्रे विशिष्ट संस्कार घेऊन येतात, म्हणूनच त्याना त्या त्या परिस्थितीत तसे वागणे त्यांना अपरिहार्य ठरते. ती बंडखोर बनत नाहीत, आणि आपल्या भोवतालच्या परिस्थितीची कारणमीमांसा करु शकत नाहीत, सोशिक हळवी आणि परिस्थिती, नियतीपुढे हतबल झालेली अशीही पात्रे वाचकांच्या हृदयाला स्पर्श करुन जातात. आणि कथेला व्यापक परिणाम कारकता प्राप्त करुन देतात.

कथेत संवादाला महत्त्व असतेच हे संवाद कथेला सजीवता प्राप्त करुन देत असतात. कथेच्या कथनाचे प्रमुख कार्यही संवादातून होत असते, ते कथेत नाट्य ही निर्माण करतात, असे अनेक प्रकारचे

कार्य करत संवाद कथानकाचे मूल्य वाढवतात.

चिरमुल्यांच्या कथेतील संवाद हे अर्थगर्भ आणि कथेला सौंदर्य-मूल्य प्राप्त करून देणारे आहेत. या संवादाना विविध कार्ये केलेली आहेत.

बहुतांशी कथा या संवादमय आहेत " श्रीशिल्लक " या पहिल्याच कथेतील विश्वेश्वर आणि सरस्वती या पात्रांच्या संवादातून दोघांच्याही मनाचे भावविश्व उभे राहिले आहे. मोजक्या संवादातून हे भावविश्व साकार करण्यात चिरमुले यशस्वी होतात.

पात्रांच्या मनस्थिती बरोबर पात्रांच्या स्वभावदर्शनाचे कार्यही संवादातून होते " श्रीशिल्लक " " धागे " " कॅाग्ज " " स्वामिनी " सारख्या कथेत ( संवादाला ) माध्यमातून पात्रांचे स्वभाव समजतात. म्हणजेच चिरमुल्यांच्या कथेतील संवाद हे त्यातील पात्रांच्या जीवंत व्यक्तिमत्वाच्या भावनांचा परिपोष करत असतांना प्रवाही, सहज ओघवते झाले आहेत.

संवादाने पात्रांची मन:स्थिती कळते, तसे त्यांचे स्वभाव विशेष ही कळतात, त्याचबरोबर कथेला गतिमानता प्राप्त करून देण्याचे कार्यही संवाद करतात. त्यामुळे कथा उत्कंठावर्धक होते.

कथेतील पात्रांच्या भावनिक संघर्षाचे सूचन संवादांनी केले आहे. " युधिष्ठिराचा रथ " मधील दिलीप आणि दिवाण बोलतात, तो प्रसंग त्याशी त्यांने केलेले भावनांचे विवेचन, पती-पत्नीच्या मनात असणारी भावनांची आंदोलने ( श्रीशिल्लक ) प्रियेसी विषयीच्या नाजूक भावना ( यात्रेकरु ) स्वत:च्याच अंतर्मनावर घातलेला संयम ( एका स्टेशनमास्तराची गोष्ट ) इ. कथांत

भावनात्मक संघर्ष समर्थ स्वरूपात व्यक्त होतो. पाईक, कॅाग्ज, स्वामिनी, चूकभूल, तत्र का परिदेवता, " नवस " या कथांतही हा संघर्ष दिसतो.

संवादातून पात्राच्या अंतरंगाचे दर्शन घडते, तसे पात्राचे चित्रणाही संवादातून घडते, हे संवाद अगदी थोड्या शब्दात येतात पण त्यातून पात्रे नजरेसमोर उभी राहतात. कॅाग्ज" मधील गोपीनाथ," चूकभूल " मधील " लक्ष्मी," " अहो भाग्यम" मधील सोनाळकर," श्री शिल्लक " मधील " सरस्वती," " धागे " मधील " सो " ती," युधिष्ठिराचा रथ" मधील दिलीप बिरदी, स्या ही सर्वच पात्रे संवादातून उभी राहतात.

कथेतील संवादांनी कथानकातील भूतकाळ आणि वर्तमान-काळ यांची सांगड योग्य रीतीने घातलेली आहे. भूतकाळातील संदर्भ आणि वर्तमान काळातील स्थिती यांचा सुयोग्य मेळ कथेला सौदर्य प्राप्त करून देतो. अशा कथातंत्रात कथानक चपखल-पणे साकार झाले आहे. हा चिरमुलेंच्या लेखणीचा विशेष आहे.

संवादातून पात्रांचे जीवनविषयक चिंतन आणि जीवनविषयक दृष्टीकोन लक्षात येतात, " मारवा" मधील नानासाहेब " बॅंकर-ट्रेडर-मॅनेजर मधील नायक, ही पात्रे तर " दि मर्मन " मधील भाईजी व सुदक्षणा यांचे जीवनाकडे पाहण्याचे दृष्टीकोन, संवादातून व्यक्त होतात. त्यांची चिंतनशील व्यक्तीमत्व

संवादातून प्रकट होतांना कथेला मूल्य प्राप्त होते.

" श्रीशिल्लक " कथासंग्रहातील अधिक कथा संवादमय आहेत या संवादातून कथा अधिक ताकदवान झाल्या आहेत, तर"कॅम्ज " मधील संवाद श्रीशिल्लकांच्या कथातील तुलनेत कमी प्रमाणात आहेत. चिरमुल्यांच्या कथांतील संवादाने कथानाचे व निवेदनाचे कार्यही केले आहे " युधिष्ठिराचा . रथ " मधील संवाद या दृष्टीने पाहण्यासारखे आहेत.

एकंदरीत चिरमुल्यांच्या कथेतील संवाद हे चिरमुल्यांच्या लेखणीचे समर्थ वैशिष्टय आहे.

कथेला सजीवता प्राप्त करुन देण्यात वातावरणाचाही खूप मोठा वाटा असतो, हे वातावरण कथेतील स्थळ-काळ, पात्रे आणि त्यांच्या कृतीशी संबंधित असतेत्यामुळे कथेतील घटना-प्रसंग आणि व्यक्तीचे स्वभाव यांच्यातील संबंध स्पष्ट होतात.

चिरमुल्यांच्या कथेत कौटुंबिक, धार्मिक, राजकीय पार्श्वभूमी-तून वातावरण आपल्यासमोर येते आणि कथा दर्जेदारपणे साकारतात. मठ, मंदिर किर्तन, गोपाळ कृष्णाची मूर्ती, शैलेश्वराचे ठिकाण या सारख्या वर्णनातून धार्मिक वातावरण प्रत्ययास येते. तर " चूकभूल " कथेतही घर आणि देऊळ यांचे उल्लेख प्रतिकात्मकतेने येतात. आणि वातावरण निर्मिती साधतात, हे चिरमुल्यांच्या लेखनशैलीचे वेगळेपण आहे. हे वैशिष्टय समर्थपणे कथेत अवतरते.

" एक ( नेहमीची ) गोष्ट" कथेतील वातावरण गंभीर आणि कारुण्यपूर्णतेने येते. संपूर्ण कथाच वातावरणाच्या माध्यमातून अधिक समर्थ ठरली आहे.

स्थळवर्णनातून वातावरण निर्मिती अधिक उठावदारपणे होते. " ट्रॅपीझ " मधील परीक्षा हॉल, मधील वातावरण कुडचीचे दर्शन, " एका स्टेशन मास्तराची गोष्ट" मधील एकल-कोंड्या स्टेशनचे वर्णन , " बेणं " मधील पछयावाड्याचे वर्णन, " युधिष्ठिराचा रथ " मधील तलावाचे वर्णन, यासारख्या कथातून स्थलवर्णनातूनही वातावरण निर्मिती करण्यात लेखकाची लेखनशैली कथेला सौंदर्यमूल्य प्राप्त करून देते.

तर " मारवा " सारख्या कथेत सुरवातीला कौटुंबिक वातावरण येते परंतु गुरुनाथच्या आगमनाने हे संपूर्ण वातावरण बदलते आणि संगीताने भारून जाते. अलौकिक असे संगीतमय वातावरण या कथेत दिसते.

काही कथा जुन्या संस्कारातून आलेल्या असल्यामुळे त्यातील वातावरणही अनुरूप असेच आहे. " श्रीशिल्लक " मधील संपूर्ण कथानक या सांस्कृतिक वातावरणातून आले आहे. सरस्वती कोणत्याही प्रकारे कुणालाही विरोध करत नाही मुकपणे दानावा विषय होते. सर्व सहन करते, तर 'चूकभूल' कथेतील वातावरणाही जुन्या संस्काराने भारलेले आहे. अशा प्रकारचे वातावरण " नवस " कथेतही दिसते.

चिरमूल्यांच्या कथांमध्ये कौटुंबिक विश्वातून आलेले वातावरण अधिक परिणामकारतेने वाचकांवर परिणाम करते " श्रीशिल्लक " " धागे " " अनिकेत " " दुःख " " एकेकाची अखेर " " स्वामिनी" " चूकभूल " " नवस " कथांतील पात्रे आणि त्यांच्या कृती -उक्तीतून

कौटुंबिक विश्व साकार झालेले आहे.

तर " तत्र का परिदेवता " या कथेतील कौटुंबिक विश्व औद्योगिक वातावरणाच्या पार्श्वभूमीने येते.

चिरमुल्यांनी निसर्गवर्णनातून वातावरण निर्मिती साधलेली आहे. ही वातावरण निर्मिती पात्राच्या अंतरंगाची कल्पना आणून देतात, उदा. युधिष्ठिराचा रथ " अशा प्रकारचे वातावरणाच्या माध्यमातून पात्राचे भावविश्व उभारण्याचे लेखकाची शैली दर्जेदार ठरते.

श्री. शरच्चंद्र वासुदेव चिरमुले यांच्या कथातील निवेदनशैलीच्या अभ्यास करतांना निवेदकांची निवेदन पध्दती चार मूलभूत सुत्रातून येते. या चार सूत्रांचा विचार केला आहे.

" श्री शिल्लक " मधील निवेदनपध्दती ही वर्णनाच्या अंगाने तर " कॅाग्जमधील निवेदनपध्दती कथनाच्या अंगाने येते.

निवेदनाच्या पध्दतीतील तृतीय पुरुषी निवेदनच या कथांमध्ये अधिक आढळते. तर कांही कथांतील निवेदन प्रथमपुरुषी आहे.

तृतीय पुरुषी निवेदनात निवेदकाने त्रयस्ताची भूमिका घ्यावी लागते. पात्र प्रसंगापासून अलिप्त राहूनच निवेदन करावे लागते. अन्यथा कथा सदोष होते. चिरमुल्यांच्या कथा निवेदनात अशी सदोषता येत नाही. अपवादात्मक "एकेकाची अखेर" या कथेत निवेदक लहान वयाचे पात्र आहे. परंतु

निसर्गवर्णनात प्रौढता व मृत्यूच्या वर्णनात निवेदक किंचितसा सर्वज्ञाची भूमिका घेतो. पण हा अपवाद वगळता निवेदकांची निवेदनशैली यशस्वी ठरलेली आहे.

घटना-प्रसंग वा पात्रांना अनुरूप अशीच निवेदनशैली या कथांत आढळते. " कॅाग्ज " कथेतील कुलकर्णी नेहमी सभ्य बोलणारा, पण गोपीनाथने संपाचा मोहोळ उठवल्यानंतर रांगड्या भाषेत बोलतो, तर " एक ( नेहमीची ) गोष्ट" मधील निवेदक घटना-प्रसंगानुरूप गंभीर बनते.

निवेदनातून जीवनविषयक चिंतन किंवा भाष्य वेधकतेने आले आहे. या चिंतनातून चिरमुल्यांच्या विचारांची सखोलता लक्षात येते. या भाष्यामुळे कथेला दर्जेदारपणा आणण्यात चिरमुल्यांचे निवेदन कमालीचे यशस्वी ठरले आहे.

प्रतिकात्मक व काव्यात्म निवेदनशैलीतून कथागत पात्रांच्या मानसिकतेचे चित्रण केले आहे. अशा निवेदनशैलीमुळे कथेत लयबध्दता आलेली आहे.

" आवर्त " कथेतील निवेदन अत्यंत सकसतेने आलेले आहे कथानिवेदन तृतीय पुरुषी आहे, परंतु निवेदक आणि पात्र यांच्यात इतके साम्य आहे की, ही कथा जणू आत्मकथाच वाटते. अशी अपरिचित निवेदनशैली या कथांत आढळते.

श्री. चिरमुले यांच्या " श्रीशिल्लक " आणि " कॅाग्ज" या कथासंग्रहातील भाषेचा अभ्यास करतांना भाषेने विविध कार्ये साधल्याचे दिसते. उदा. १. भावनांचे प्रगटीकरण करणे, २. पात्रांचे व्यक्तिमत्व साकार करणे, ३. विविध भावनांचे आदान-प्रदान करणे ४. विविध संदर्भ देणे ५. अचेतनाला सचेतन

करणे ६. अविष्कार करणे इ.

या कथांतील भाषेने वरील विविध प्रकारचे कार्य साधल्याचे प्रकरण दोन आणि तीन मध्ये " भाषा" या घटकाचा अभ्यास करतांना पाहिले आहे.

भाषेच्या माध्यमातून अपरिचिताचा शोध घेण्यात चिरमुल्यांची लेखनशैली यशस्वी, समर्थ ठरली आहे. " मारवा" व " आवर्त" कथेतील भाषा संगीतातील सुरांची आवर्ते शब्दात पकडण्याचा प्रयत्न करते. हे चिरमुल्यांच्या लेखनीचा वेगळा विशेष प्रकर्षाने जाणवतो. अशा प्रकारचो,अपरिचितता, व्यक्तीच्या कृती-उक्तीमधूनही दिसून येते, उदा. बँकर-ट्रेडर-मॅनेजर, " युधिष्ठिराचा रथ १ आहो भाग्यम् " इ. कथांतील भाषा.

या भाषेत कुठेही शब्दांचा सोस, काठिण्य जाणवत नाही, तर ओघवत्या, सहज प्रासादिक शैलीतून आणि अनुरूप प्रतिमा-प्रतिकांतून ही भाषा प्रभावी ठरली आहे.

या कथांतील भाषेत काहीवेळेला क्रियापदाचा वापर टाळलेला आहे. त्यामुळे भाषेला काव्यात्मता, लाभलेली आहे. उदा. एका स्टेशनमास्तराची गोष्ट," " आवर्त ".

सूचक भाषाशैलीमुळे कथेला भारदस्तपणा येतो. अशी सूचक भाषाशैलीही या कथांत आढळते, उदा. " युधिष्ठिराचा रथ.

स्त्री पात्रांची भाषा ही संस्कारशील संयमी आहे. या भाषेने जुनी सांस्कृतिकता जोपासली आहे. उदा. " श्रीशिल्लक" मधील सरस्वती, " आवर्त"ची नायिका, [illegible], स्वामिनीची नायिका इ.

स्थळवर्णनातून निसर्गाला जीवंतरूप आले आहे. अशी अचेतनाला सचेतन करणारी भाषा या कथांत आढळते.

चिरमुल्यांच्या कथांतील ही सगळीच पात्रे विशिष्ट सांस्कृतिक वातावरणातून येत असल्यामुळे पात्रांना अनुरूप अशी भाषाच या कथांत आढळते. संपूर्ण कथांमध्ये बोली-भाषेचा वापर फक्त एकाच पात्राच्या तोंडी आहे.( एका स्टेशनमास्तराची गोष्ट )

एकंदरीत चिरमुल्यांची भाषाशैली ही प्रौढ गंभीर, सकस अशी आहे.

चिरमुल्यांच्या अनुभवविश्वाचा विचार करतांना हे अनुभव-विश्व विविधतेने नटलेले आहे. विशेषत: माणसांच्या स्वभावाचा सूक्ष्मातिसूक्ष्म तळ ते शोधतात. ही माणसे आणि त्यांचे वर्णन हाच चिरमुल्यांचा बहुतांशी माणसामाणसांतले विविध संबंध त्यांची दु:खे श्रध्दा इत्यादीचे विविध पदर आणि त्यातून संपन्न असे भावविश्व या कथांतून साकार झाले आहे.

कांही कथांतील अनुभवविश्व हे अपरिचिताचा अनुभव देणारे आहे. " श्रीशिल्लक " " मारवा" " एका स्टेशनमास्तराची गोष्ट , " आवर्त," अहो भाग्यम् " इ.कथांतून परिचितातील अपरिचित असे अनुभवविश्व या कथांतून आढळते.

माणसांच्या जीवनातील अनेक घटना-प्रसंग, त्यांचे आंतरमन व बाहयमन, त्याचे सामाजिक जीवन इ बरोबरच अपरिचित असे

संगीतमय व त्यासंदर्भातील अपरिचित अनुभवविश्व, औदयोगिक क्षेत्र - अशाप्रकारचे वैविध्यपूर्ण संपन्न असे अनुभविश्व या कथांत आढळते.

एकंदरीत विरमुल्यांच्या कथेचा अभ्यास करतांना त्यांच्या कथालेखणाची समर्थता लक्षात येते. अगदी मोजक्या कथांमधून त्यांनी लेखक म्हणून आपला ठसा मराठी कथासाहित्यावरती उमटविलेला आहे. या कथांची कथानके पाहिली तर विविधतेबरोबर त्यामधली परिपक्वताही जाणवते. या कथा विस्तृत स्वरूपाच्या आहेत. पण तितक्याच आशयाने समृध्द आहेत.

ही कथा व्यापक जीवनानुभव मांडणारी कथा आहे. माणूस जगतांना त्याचे स्वत:शी कुटूंबाशी, समाजाशी, अनाकलनीय अशा नियतीशी व परमेश्वराशी आलेले विविध संबंध या कथांतून चित्रित केले आहेत. त्याबरोबर या कथांतून माणसाच्याच शोध कथाकार विलक्षण रीतीने घेताना दिसतात. माणसाचे मन हाच त्यांच्या कथांचा विषय असून त्यातून मानवी जीवनाविषयीचे चिंतन ते करतात. म्हणूनच त्यांच्या ' कथानकात विविधतेबरोबर परिपक्वताही जाणवते.

ही कथानके कसदार अनुभव मांडणारी आहेत त्याचप्रमाणे या कथातील पात्रेही विलक्षण तितकीच कसदार आहेत. त्यांना स्वतःचे असे व्यक्तिमत्व आहे. पण त्यांच्यावर कांहीसा नियतीचा प्रभाव जाणवतो. ही पात्रे स्वत:वर आलेले प्रसंग, स्वत:ची दु:खे निमुटपणे सहन करतात. त्यांनी सोशिकपणे स्वत:चे दु:ख स्वीकारलेले आहे. विशिष्ट संस्कार घेऊन आलेली ही पात्रे संवेदनाक्षम आहेत. कांही पात्रांच्या वृत्तीत अलिप्त आहेत.स्त्रीपात्रेही

अशीच संस्कारशील, कसदार आहेत.

या कथांतील संवाद हे प्रवाही, अर्थगर्भ आहेत या संवादातून कथानकाला सजीवता प्राप्त झाली आहे. विशेषतः पात्रांच्या अंतरंगाचे दर्शन या संवादांनी चांगल्या त-हने घडते. म्हणजेच कथेतील पात्रे आणि त्यांची व्यक्तिमत्वाचे, स्वभावाचे दर्शन संवादातून होते.

चिरमुल्यांच्या कथेतील वातावरण पाहिले तर त्यातील भिन्नताही सहज लक्षात येते. कथेतील पात्रांच्या कृती-उक्तींशी संबंधित असलेली ही वातावरणनिर्मिती कथेला सजीवता प्राप्त करून देते. चिरमुल्यांच्या कथेतील ही वैशिष्टयपूर्ण वातावरण-निर्मिती कथेला सौंदर्य प्राप्त करून देण्यात यशस्वी झाली आहे.

या कथा बहुतांशी तृतीय निवेदन पध्दतीतून साकार झालेल्या आहेत. ही पध्दत अवलंबितांना लेखकाने आपली त्रयस्थाची भूमिका कुठेही सोडलेली नाही. ही निवेदनपध्दती पात्राच्या वय, लिंग, व्यवसायानुसार बदलते, पात्रानुसार-त्यांच्या विचार, भावनांनुसार ही निवेदनशैली बदललेली आहे. त्यामुळे ही निवेदनपध्दतीही समर्थ ठरली आहे.

या कथा साकार करणारी चिरमुल्यांची भाषाशैली, प्रौढ, गंभीर, सकस आहे या भाषेतून घटना व प्रसंग, पात्रे ठाशीव स्वरूपात गोचर झालीआहेत. या भाषेतून विरोध-लयाचा अविष्कारही फार समर्थपणे व्यक्त झाला आहे. तसेच चार-दोन वाक्यात चित्र उभे करण्यात ही भाषा अत्यंत यशस्वी

ठरली आहे. विशेषत: सुरांची आवर्तनं शब्दांत पकडण्याचा चिरमुलेंचा प्रयत्न वैशिष्टयपूर्ण आहे. तर काही वेळा ही भाषा काव्यात्म बनते. या भाषेतून पात्रांचे भावविश्व, विचार, चिंतन, आणि त्यातून त्या पात्रांचे व्यक्तिमत्व आपल्यापुढे साकार होते. अशी काव्यात्म, चित्ररम्य, प्रतिकात्मक भाषाशैली ही या कथेला दर्जेदार बनवते.

या कथा चिरमुलेंच्या व्यापक अनुभवविश्वातून आलेल्या आहेत. विशेषत: माणसाच्या मनाचा शोध घेण्याच्या, प्रवृत्तीतून हे अनुभवविश्व आलेले आहे परिचितातून अपरिचित असे अनुभवविश्व उत्कट तरलतेने वाचकांसमोर येते.

अशा विविध गुणवैशिष्टयांमुळे लेखक श्री शरच्चंद्र वासुदेव चिरमुले हे आपल्या समकालीनांमध्ये वैशिष्टयपूर्ण व समर्थ कथाकार ठरतात. भविष्यकाळातही त्यांच्या कथा प्रभावी व वाचनीय ठरतील.